पुण्य नगरी
आरोग्यजागर
। उत्तम आरोग्य । उज्ज्वल भविष्य ।





# मणका आणि मज्जारज्जूंचे विकार यावर होमिओपॅथिक उपचार




मज्जारज्जू हा शरीरातील अतिशय महत्त्वाचा भाग आहे. पाठीच्या कण्यातून जाणारा मज्जारज्जू (spinal cord) हा मेंदू व शरीर यामधील दुवा आहे. मज्जारज्जू हा मेंदूपासून इंद्रियांपर्यंत व इंद्रियांपासून मेंदूपर्यंत संवेदनांचे आदानप्रदान करण्याचा मार्ग आहे.

मज्जारज्जू म्हणजे मज्जापेशींचा लांबलचक व पातळ असा नळीच्या आकारात असलेला दोरखंड आहे. मज्जारज्जू डोक्याच्या कवटीच्या मागील भागापासून (occiput) सुरू होतो ते कमरेसंबंधीच्या पहिल्या आणि दुसऱ्या मणक्यातील मधल्या भागापर्यंत पसरलेला आहे. मेंदू आणि पाठीचा कणा एकत्रितरीत्या मिळून मध्यावर्ती मज्जासंस्था (CNS) तयार करतात.

त्याची लांबी पुरुषांमध्ये ४५ सेंमी, तर महिलांमध्ये ४३ सेंमी असते. ह्या दोरखंडाची जाडी १३ मिमी मानेच्या मणक्यात, तर ६.४ मिमी वक्षस्थळातील मणक्यात असते. ह्या लहान पाठीच्या कण्याचे संरक्षण त्याच्या सभोवताली असलेल्या मेरुदंडामुळे होते. मज्जारज्जू प्रामुख्याने मेंदू आणि शरीरातील विविध भागांपर्यंत मज्जासंस्थेसंबंधीचे प्रसारित करण्याचे काम करतो. याशिवाय काही (reflexes) स्वतंत्रपणे प्रसारित करण्याचे किंवा नियंत्रित करण्याचे महत्त्वाचे काम इथे होते. Spinal Cord Compreessiof (मज्जारज्जूवर दाब पडून अरुंद व लहान होणे. याला Spinal Cord Compreession असे म्हणतात.

हा आजार मानेच्या मणक्यापासून कमरेच्या मणक्यापर्यंतच्या कुठल्याही भागात मज्जारज्जूवर दाब पडून त्याचा मार्ग अडवून ठेवतो. मणक्याच्या वेगवेगळ्या आजारामुळे मज्जारज्जू अरुंद होऊन जातात. त्याचे कारण म्हणजे मेंदूकडून शरीराकडे जाणारे संदेश, त्याचबरोबर शरीराकडून मेंदूकडे जाणाऱ्या संवेदना यांच्या कार्यात बिघाड निर्माण होतो आणि बधिरपणा, वेदना आणि अशक्तपणा तर कधी कधी पॅरालिसिससारखी लक्षणे उद्‌भवतात. मणक्याच्या प्रत्येक आजाराच्या कारणाबरोबर लक्षणाची तीव्रता हळूहळू वाढत गेलेली अथवा अतिजलद पद्धतीने उद्‌भवलेली निदर्शनास येते. सर्वसामान्यपणे मणक्याची झीज झाल्यामुळे, तसेच मणक्यातील गादीची झीज मणक्याची गादीरूपी चकती सरकून ती मज्जारज्जूवर दाब टाकून देऊ लागते. त्याचवेळी बाजूच्या नसांवर दाब पडून तीव्र वेदना उद्‌भवू लागतात आणि अस्वभाविक संवेदना निर्माण होतात.

**लक्षणे :-**

१. मान दुखणे, चक्कर येणे.
२. हातामध्ये जडपणा वाटणे.
३. मळमळ व उलटीचा त्रास होणे.
४. चालताना अडखळणे.
५. हातात व पायात विजेचा झटका बसल्याप्रमाणे वेदना होणे.
६. काही सूक्ष्म शारीरिक क्रिया करता न येणे. जसे की लिहिता न येणे, शर्टचे बटन लावता न येणे.
७. शरीराचा समतोल ढासळणे.

**कारणे :-**

१. वाढत्या वयानुसार मणक्यातील निरुंदता वाढत जाते.
२. शरीरातील कुर्चे जाडसर होणे
३. अविशिष्ट ठिकाणी मणक्यातील हाड वाढल्यामुळे मणक्यातील जागा निरुंद होणे.
४ मणक्यातील हाडांचे फ्रॅक्चर
५ हाडांची झीज होणे.
६ संधिवात
७ जन्मतःच मणक्यातील विकृती
८ spofdylosisएक मणका दुसऱ्या मणक्यावर सरकल्यामुळे त्रास होणे.
९. अपघातामुळे मणक्यास इजा पोहोचणे.
१०. मणक्यातील गाठी (tumors)

ह्या आजाराचे निदान वैद्यकीय चिकित्सेने -RÔy किंवा MRI केल्याने होते.

**काळजी :-**

१. ह्या आजाराच्या गांभीर्याबद्दल माहिती असणे महत्त्वाचे आहे.
२. नियमित व्यायाम डॉक्टरांच्या सल्ल्याने करणे. जसे की सायकल चालवणे, पोहणे, चालणे इ.
३. वजन आटोक्यात ठेवणे, वजन वाढले तर वेदना वाढतात. वजन कमी केल्यास stefosis ची प्रक्रिया मंदावते.

**: केस :**

ही एका ४६ वर्षाच्या पुरुषाची केस आहे. जो लोणावळ्यातील एका छोट्या खेडेगावात वास्तव्यास होता. त्याच्या मानेच्या मणक्यातील चकती सरकल्यामुळे मज्जारज्जूच्या दोरखंडाभोवती सूज निर्माण झाली होती आणि मज्जारज्जूवर दाब पडून तो अरुंद झाला होता. अशी परिस्थिती पाहून मुंबईतील दवाखान्यात त्याला ताबडतोब शस्त्रक्रिया करण्यास सांगितले होते. जर वेळीच शस्त्रक्रिया नाही केली तर त्याला श्वसनास अडथळा निर्माण होऊन, लकवा येण्याची शक्यता डॉक्टरांनी वर्तवली होती.




अशा अवस्थेत रुग्ण त्याला पालकांसमवेत माझ्याकडे आला. त्याच्या डोक्यावर गांधी टोपी होती. जरी तो खेडेगावातून आलेला असला तरी त्याच्या बोलण्यात स्पष्टता होती. जरी तो खूप वेदनेत होता तरी तो खूप चिकित्सक व जागरूक वाटत होता. मला शस्त्रक्रिया टाळण्याची विनंती करीत होता. तो मला सतत विचारू लागला, ह्यह्य की मी? कले आहे की मणक्याच? शस्त्रक्रिया प्रत्येकवेळी यशस्वी होतेच असे नाही. ह्यह्य त्याची चिकित्सा चालू केल्यावर लगेचच थोड्या वेळात त्याला गरगरू लागले व त्याचा तोल जाऊ लागला. त्यामुळे झोपलेल्या अवस्थेत त्याची माहिती विचारण्यात आली.

**त्याच्या तक्रारी पुढीलप्रमाणे :**

१. पायात मुंग्या येऊन ओढल्यासारख्या वेदना होणे.
२. उजव्या अंगाला जास्त करून मुंग्या येणे.
३. पोळल्यासारख्या वेदना शरीराच्या डाव्या अंगात होणे.
- दिवसा लक्षणांमध्ये वृद्धी
- संध्याकाळी लक्षणे कमी होणे.
४. चालताना सरपटणे.
५. अधूनमधून छातीत दुखणे.
६. थंड वाऱ्याने त्रास वाढणे.
७. पांघरूण घेतल्यावर बरे वाटणे.
८. हातापायात ताकद नसणे.

विशेष माहिती:
१. जेवणात मांसाहाराची आवड
२. गोड पदार्थांची नावड
३. तिखट पदार्थांनी त्रास होणे.
४. थंड प्रकृती

**त्याची माहिती पुढीलप्रमाणे:**

**१. तुमचा स्वभाव कसा आहे?**

- कोणी मला काही बोलले तरी मी प्रत्युत्तर देत नाही. पण जर ते माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे गेले तर मला ते सहन होत नाही.

**२. तुमच्या लहानपणाबद्दल सांगा?**

- माझ्या घरची परिस्थिती खूप नाजूक असल्यामुळे व १५ ते १६ जणांचे मोठे कुटुंब असल्यामुळे मी इयत्ता सातवीपर्यंतच शिक्षण घेऊ शकलो. माझ्या वडिलांचे निधन लहानपणीच झाले. आता आम्ही सर्वजण विभक्त आहोत.

नंतर मी काही दिवस रस्त्यावर राहिलो. त्यानंतर कापड कारखान्यात नोकरी लागली. तिथे मी २२-२३ वर्षे काम केले. तो कारखाना बंद पडला. मग मी गावी परतलो. गावी आल्यावर भावाने केलेले कर्ज फेडले. घर पुन्हा नव्याने बांधले. गावाला येऊन मी शेती करू लागलो. सध्या छोटासा व्यवसाय चालू केला आहे. मला २ मुली व तीन मुले आहेत. एका मुलीचे लग्न झाले व बाकीच्यांचे शिक्षण चालू आहे.

**३. तुम्हाला राग कधी येतो?**

- जेव्हा मी बांधलेल्या घरामध्ये माझे भाऊ व त्यांच्या बायका येण्यास मनाई करतात तेव्हा मला प्रचंड राग येतो. माझ्या भावांनी माझी जमीन हडपली. २० वर्षे झाले आमचे शेतीवरून भांडण चालू आहे. माझे भाऊ माझ्या घरी येत नाहीत. आता मी आजारी आहे तरीसुद्धा मला बघायला येत नाहीत. माझ्या काकांनी आमच्या वडिलोपार्जित शेतीतील काहीच हिस्सा आम्हाला दिला नाही याची कोर्टात केस चालू आहे, त्यांनी खूप कमी किमतीत जमीन विकून टाकली. मी आयुष्यभर काम करून मिळवलेला पैसा कोर्ट-कचेरीत वाया जात आहे. आमच्या कुटुंबापैकी मी एकटाच की केस लढत आहे आणि मला माहितीय की मी ही केस जिंकणार आहे. आता मला मुलांची व त्यांच्या भविष्याची खूप काळजी वाटत आहे. आता माझी मुले खूप लहान आहेत. ती शिकत आहेत आणि मला हा आजार जडला आहे. जर मी माझ्या शस्त्रक्रियेसाठी कर्ज घेतले तर माझ्या मुलांच्या भविष्याचे काय? माझ्या मुलांसाठी मला बरे झालेच पाहिजे. मी माझ्या भावांशी कधीच भांडत नाही.

माझ्या भावांचे म्हणणे आहे की, जर काकांनी जमीन विकली आहे तर ती विसरून जा. पण तरी मी त्यांच्या विरोधात केस लढत आहे.

**४. तुमच्या भविष्याविषयी काय वाटत आहे?**

- जोपर्यंत माझी मुले स्वतःच्या पायांवर उभी राहत नाहीत तोपर्यंत मला धष्टपुष्ट रहायचे आहे आणि त्यांच्यासाठी मला खूप काही करायचे आहे.

संपूर्ण व्यक्तिमत्त्व :
१. अन्याय सहन न होणे.
२. अपमानित झाल्याची भावना
३. स्वतःच्या तब्येतीविषयी व दुसऱ्यांविषयी काळजी वाटणे.
४. जवळच्या लोकांकडून दुर्लक्षित झाल्याची भावना
५. सूडबुद्धी
६. आशावादी
७. थंड प्रकृती
८. मांसाहाराची आवड
९. गोडाची नावड
१०. शरीराच्या डाव्या बाजूला पोळल्यासारख्या वेदना
११. पाठीत मुंग्या येणे.
१२. पायात ओढल्यासारख्या वेदना

प्रतिसाद :

या लक्षणांवरून पेशंटला ३ ते ४ आठवडे भरती होण्यास सांगितले. त्यानंतर हळूहळू त्याच्या शरीरातील मुंग्या येण्याचे प्रमाण कमी झाले. त्याची चक्कर थांबली व तो सावरू शकत होता. जे त्याला भुरकट दिसत होते ते कमी झाले. हात-पाय गळून गेल्यासारखे वाटत होते ते ३ आठवड्यात नाहीसे झाले. एकाच होमिओपॅथिक औषधाच्या मात्रेमुळे त्याला त्याच्या शरीराचा तोल सांभाळता येऊ लागला. हळूहळू तो त्याचे दैनंदिन कार्य व्यवस्थितपणे करू लागला व त्याची शस्त्रक्रिया टळली. प्रत्यक्ष orthopedic हि शस्त्रक्रियेची केस आहे, असे ठाम सांगितले होते, परंतु केवळ होमिओपॅथिक उपचारांनी ही अत्यंत नाजूक आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया टाळणे शक्य झाले. शस्त्रक्रियेजन्य आजारातदेखील शस्त्रक्रिया न करता निःशस्त्र होमिओपॅथिक उपचाराने रोगावर मात करणे शक्य होऊ शकते.

**पत्ता – आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क – ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**

# तंबाखूविरोधी दिनानिमित्त जनजागृती अभियान

**। पुणे : प्रतिनिधी**

जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त ज्ञानेश्वरी प्रतिष्ठानच्या वतीने जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्ञानेश्वरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. सायली कुलकर्णी यांनी दिली. यावेळी आयोजक प्रसाद कुलकर्णी उपस्थित होते.



ज्ञानेश्वरी प्रतिष्ठानच्या वतीने महिला व युवक कल्याण, कला, आरोग्य, शैक्षणिक क्षेत्रात आणि विशेष मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. यावर्षी तंबाखू विरोधीदिनानिमित्त तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या जीवनहानी बद्दल मोठ्या प्रमाणात जनजागृती व्हावी, यासाठी 'होय मला तंबाखू मुक्त महाराष्ट्र हवा' हे अभियान घेण्यात आले.

कर्करोगाला निमंत्रण देणाऱ्या तंबाखू, गुटखा, सुपारीच्या सवयींचा तात्काळ त्याग करा व सदृढ आनंदी जीवन जगा, असा संदेश या अभियानाद्वारे महाराष्ट्रभर देण्यात येणार आहेय़ा कार्यक्रमाचा शुभारंभ येत्या शुक्रवारी रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे दुपारी बारा वाजता होणार आहे.

तंबाखूमुक्त महाराष्ट्र अभियानासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यवरांचा व तंबाखूसेवनामुळे पिडीत असलेल्या नागरिकांच्या आरोग्यासाठी झटणाऱ्या वैद्यकिय कर्मचाऱ्यांचा या सोहळ्यात सत्कार करण्यात येणार आहे. तंबाखूमुक्त महाराष्ट्र संकल्पनेतून आयोजित आंतरमहाविद्यालयीन पोस्टर स्पर्धेतील विजेत्यांचा या सोहळ्यात सत्कार करण्यात येणार आहे.

तंबाखूमुक्त महाराष्ट्र या संकल्पनेतून आयोजित आंतरमहाविद्यालयीन पोस्टर स्पर्धेतील विजेत्यांना या कार्यक्रमात गौरविण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या पोस्टरचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे, असे आवाहन डॉ. कुलकर्णी यांनी केले.

# इच्छामरण विषयावर परिसंवाद

**। पुणे : प्रतिनिधी**

दयामरण, इच्छामरण म्हणजे नेमके काय, व्हेजिटेटिव्ह अवस्थेतील रुग्णाला मरण बहाल करण्याची खरीच आवश्यकता आहे का?. या विषयावर कायदेशीर, नैतिक, सामाजिक, कौटुंबिक, भावनिक, आर्थिक बाजू काय आहेत, या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकिय, वैधानिक, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेल्या व्यक्ती या परिसंवादात सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम येत्या सोमवारी (दि. १) जून रोजी पद्मावती येथील अण्णा भाऊ साठे रंगमंदिरात सायंकाळी पाच ते सात या वेळेत होणार आहे.




# मंगेशकर हॉस्पिटल परिसरात कचरा प्रश्न गंभीर

**। पुणे : प्रतिनिधी**

दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल परिसरात कचऱ्याची समस्या गंभीर झाली असून दुर्गंधी पसरली आहे. याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाने या ठिकाणी तात्काळ साफसफाई करावी अशी मागणी केली जात आहे.

ज्ञानदा शाळा नवसह्याद्री मैदानासमोर १०० फुटी डी.पी. रोड, बनियन ट्री हॉटेलजवळ, रानडे लॉन्स, मातोश्री वृध्दाश्रमासमोरील पादचारी मार्ग, पंडित दिनदयाळ शाळा, अभिनव इंग्लिश शाळेजवळ, भरत कुंज सोसायटीच्या हॉलजवळ, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी उद्यान, पटवर्धन बाग, या भागातील कचऱ्यांच्या ढिगांची लवकरात लवकर साफसफाई करुन महापालिकेतर्फे दंडात्मक कारवाईचे फलक लावावेत तसेच या परिसरात कचऱ्याच्या समस्या सोडविण्यासाठी घंटागाड्यांच्या संख्येत वाढ करावी,ज्यामुळे नागरिक अशा ठिकाणी कचरा टाकणार नाहीत अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सांस्कृतिक विभागाचे सनी मानकर यांनी केली आहे.

> **येत्या आठ ते दहा दिवसांत शहरात पावसाळ्यास सुरुवात होईल त्यापूर्वी महापालिकेच्या आरोग्य विभागाने मंगेशकर रुग्णालय परिसरातील कचरा प्रश्न तात्काळ सोडवावा. पाऊस सुरु झाल्यानंतरही अशीच स्थिती राहिली तर अस्वच्छतेमुळे दुर्गंधी, डास यांचा त्रास होऊन आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल.**
> **– अभिजित जाधव, नागरिक**

तसेच दीनानाथ मंगेश हॉस्पिटल परिसरातील कचरा प्रश्न तात्काळ सोडवून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी.

पावसाळा काही दिवसांवर येथून ठेपला आहे त्यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाने शहर आत्तापासूनच स्वच्छ करण्यावर भर दिला पाहिजे. अन्यथा पावसाळा सुरु झाल्यानंतर कचऱ्याची दुर्गंधी पसरेल.

# रोटरीच्या वतीने शनिवारी कर्करोग तपासणी

**। पुणे : प्रतिनिधी**

रेल्वे कर्मचारी व त्यांच्या परिवारासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर मंडल रेल प्रबंधक कार्यालय, हॉटेल ली मेरेडियनजवळ, शनिवार (दि.२९) रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे.

रेल्वे कर्मचारी व त्यांच्या परिवारासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रोटरी क्लब होरायझन, रोटरी क्लब शनिवारवाडा, रोटरी क्लब औंध, रोटरी क्लब नगररोड व रोटरी क्लब हिंजवडी यांच्या वतीने मंडल रेल प्रबंधक कार्यालय, हॉटेल ली मेरेडियनजवळ, पुणे येथे हे शिबिर होणार आहे. या शिबिरामध्ये ब्लडप्रेशर, डायबेटिस, रक्ततपासणी या तपासण्यांसह महिलांसाठी मॅमोग्राफी (स्तनांची कर्करोग तपासणी) करण्यात येणार आहे.नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे महामंत्री कॉ. वेणू पी. नायर, डी. जी. ३१३१चे विवेक आरान्हा, ए. जी. पूजा गिरी, रोटरी क्लब होरायझनचे अध्यक्ष विनोद पाटील, रोटरी क्लब शनिवारवाडाचे अध्यक्षा अपर्णा रानडे, रोटरी क्लब औंधचे अध्यक्ष हेमंत, डॉ. अन्वर शेख व रोटरी क्लब हिंजवडीचे अध्यक्ष अमित मराठे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे शिबिर होणार आहे. यावेळी कॉ. मल्लीनाथ भीमाशंकर , कॉ. सुनील बाजारे, कॉ. सुनील कमठाण आदी उपस्थित राहणार आहेत.

# आपलं व्यासपीठ

## इंदिरानगरचा विकास कधी?



पाबळमध्ये मी ज्या परिसरामध्ये वास्तव्यास आहे. तो परिसर इंदिरानगर म्हणून ओळखला जातो, हा परिसर पाबळ ग्रामपंचायतीपासून अगदी हातभर अंतरावर असूनसुध्दा आजपर्यंत येथे एकही विकास काम किंवा शासनाची योजना, सोयी सुविधा राबविल्या गेल्या नाहीत. गावामध्ये बहुतेक ठिकाणी गटारयोजना, रस्ते योजना, सौर दिवे योजना, यासारख्या अनेक योजना राबविल्या गेल्या आहेत. पण या परिसरातील लोकांनी हजारवेळा विनंत्या करुनही आपल्या परिसरातील समस्या मागण्या, ग्रामसभेत मांडूनही आजपर्यंत एकही योजना येथे राबवली गेली नाही. महिन्यात रस्ता बांधू गटारे काढू, सौरदिवे लावू ही पोकळ आश्वासने व उडवा-उडवीची उत्तरे कित्येक वर्षापासून आम्हाला ऐकायला मिळत आहे. प्रत्यक्षात एकही विकास काम या ठिकाणी पाहायला मिळत नाही. त्यामुहे इंदिरानगर विकासापासून व शासकीय योजनांपासून वंचित रहावे असे जाहिर तर केले नाही ना असे वाटून जाते. विशेष म्हणजे या भागासाठी आजपर्यंत जेवढे ग्रामपंचायत सदस्य निवडले गेले, त्यांच्या नाकर्तेपणामुळे आणि अकार्यक्षमतेमुळे या परिसरात एकही योजना राबवली गेली नाही. साधा विजेचा खांबावरील बल्ब बदलण्यास सांगितला तर तो बदलण्यास एक वर्षांचा काळ लागतो. त्यामुळे इंदिरानगरचा विकास कधी हा गहन प्रश्न सर्वांना पडला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे लोकांनी येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूकामध्ये पोकळ आश्वासने देणाऱ्या विकासाच्या नावाने शिमगा असणाऱ्या लोकांच्या समस्या न जाणणाऱ्या, अशिक्षीत उमेदवारांना निवडून न देता आपल्या परिसराचा जो विकास करु शकतो अशाच उमेदवाराला निवडा. जेणेकरून गावाचा विकास होईल.

**रोहिदास सुखदेव जगताप, मु. पो. पाबळ, ता. शिरुर जि. पुणे.**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

**उत्तम कामगिरी करत मुंबई इंडियन्सने रविवारी चेन्नई सुपर किंग्जवर सुपर विजय मिळविला आहे. दोन वर्षांपूर्वीच्या कामगिरीची पुनरावृत्ती करत मुंबई इंडियन्सने दुसऱ्यांदा विजेतपदाचा बहुमान मिळवला. रोहित शर्मासाठी ऐतिहासिक ईडन गार्डन मैदान पुन्हा एकदा लकी ठरले; तर प्रथम गोलंदाजी स्वीकारण्याचा धोनीचा निर्णय चेन्नईच्या मुळावर आला. मंबईच्या या दमदार विजयाबाबत तरुणांच्या या प्रतिक्रीया...**




### अनपेक्षित विजय...

मुंबई इंडियन्सची सुरूवात अत्यंत खराब झाली होती. सलग पाच सामने हारल्यानंतर मुंबई बाद फेरीतही पोहचते की नाही, अशी स्थिती होती. त्यामुळे ती फायनलपर्यंत पोहचेल आणि ती जिंकलेही असे अपेक्षितच नव्हते. मुंबईचा विजय धक्का देणारा आणि अनपेक्षित आहे. मात्र, त्यांनी जिंकण्यासाठी मोठे कष्ट घेतले आहे. त्यांच्या खेळण्यावरून ते दिसून येते.



**बजरंग तांगडकर**

### धोनीचा निर्णय चुकला...

अंतिम सामना मुंबईच जिंकणार असा अनेकांचा अंदाज होता. त्यामुळे त्यांना जास्तीत जास्त टार्गेट देवून हरविणे, हा उद्देश ठेवून चेन्नईने मैदानात उतरायला पाहिजे होते. त्यामुळे टॉस जिंकल्यानंतर धोनीने प्रथम बॅटींग करायला पाहिजे होती. मात्र त्याने तसे केले नाही. धोनीचा तो निर्णय हार होण्यामागचे सर्वात मोठे कारण आहे. प्रथम बॅटींग केली असती तर कदाचित वेगळा निकाल लागू शकता असता. मुंबईने मात्र संधीचे बरोबर सोने केले.



**अभिजित वैद्य**

### कधी काय होईल...

मुंबईला सेमीफायनलमध्ये विजय मिळाल्यानंतर आयपीएल फीक्स आहे, अशी जोरदार चर्चा सुरू झाली होती. सुरुवातीला अत्यंत दयनीय स्थितीत असलेला संघ अंतिम वेळी एवढी चांगली कामगिरी कशी करू शकतो, असा प्रश्नही अनेकांनी उपस्थित केला होता. मात्र मुंबईच्या खेळीने हे दाखवून दिले की, मॅच फिक्स नाही. तसेच या विजयामुळे क्रिकेटमध्ये कधी काय होईल, हे सांगता येत नाही.



**प्रमोद वैद्य**